INTERNATIONAL RESEARCH FELLOWS

Impact Factor - 6.625 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred Journal

February - 2020 Special Issue - 239

# Contemporary Issues in Commerce & Management



**Guest Editor :**
Dr. S. K. Patil
Principal,
B. P. Sulakhe Commerce College, Barshi
Tal. Barshi, Dist Solapur.

**Executive Editors :**
Dr. S. D. Jamge
Prof. K. B. Chapte
Smt. J. R. Yadav

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 59 | महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्यस्थिती – समस्या व उपाय | डॉ. आर. टी. माने | 282 |
| 60 | भारताच्या आर्थिक विकासात विदेशी व्यापाराची भूमिका | डॉ. एस. एम. बिराजदार | 288 |
| 61 | व्यापारी बँक आणि त्यांचे कार्य : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. एस. एम. मलकापुरे | 292 |
| 62 | भारतातील कृषीक्षेत्रातील अलीकडील बदलाचा अभ्यास | प्रा. लालचंद्र संते | 299 |
| 63 | महाविद्यालयीन ग्रंथालय : वित्तीय व्यवस्थापन | श्री एस.एल. जाधव व श्रीमती जे.आर. यादव | 303 |
| 64 | ग्रामीण विकासात नाबार्ड ची भूमिका | डॉ. डी. बी. कोनाळे | 309 |
| 65 | सामुदायिक सामाजिक जबाबदारी | प्रा. भगवानसिंग गिरासे | 314 |
| 66 | अलीकडील काळातील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाचे मूल्यमापन | डॉ. डी. एस. शहापुरे | 321 |
| 67 | २०२० सालच्या भारत देशाच्या अर्थसंकल्पावर भाष्य करणाऱ्या व्यंगचित्रांचा अभ्यास | श्री प्रवीण मस्तूद | 332 |
| 68 | बी.एड्. महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्धतीच्या अध्यापनात संगणक सहाय्यित अध्यापन पद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ. शशिकांत तांबे | 340 |
| 69 | कॉर्पोरेट क्षेत्राची सामाजिक बांधिलकी : अपेक्षा आणि वास्तव | डॉ. विशाल लिंगायत | 343 |
| 70 | महाविद्यालयीन ग्रंथालयातील एन-लिस्ट कन्सोर्शिया | श्रीमती ज्योती यादव, श्री विशाल रोगे | 347 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# कॉर्पोरेट क्षेत्राची सामाजिक बांधिलकी : अपेक्षा आणि वास्तव

डॉ.विशाल प्रकाश लिंगायत
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
ता. बार्शी जि. सोलापूर ४१३ ४०१
भ्रमणध्वनी ७५८८० २०२१०
Mail- vishallingayat28@gmail.com

**प्रास्ताविक :–**

कॉर्पोरेट संस्थांची म्हणजेच औदयोगिक घराण्यांची सामाजिक जबाबदारी व त्यांचे सध्याच्या काळात असणारे धोरण, त्यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा व त्याची वास्तवता बघितल्यास कॉर्पोरेट क्षेत्र हे सदयपरिस्थितीत अतिशय गुंतागुंतीचे, अनाकलनीय व बेभरवशाचे ठरले आहे. अनेक प्रकारच्या वेगवेगळया गोष्टींशी, संकटांशी त्यांना सामना करावा लागतो आहे. अशाही परिस्थितीत या संस्थाची सामाजिक बांधिलकी हा आज चर्चेचा विषय झाला आहे. बुध्दिमत्ता, विचारशक्ती, ज्ञान, कल्पना व भावना या मनुष्य प्राण्याला मिळालेल्या देणग्या आहेत. त्याचा वापर योग्य तऱ्हेने, योग्य वेळी, योग्य ठिकाणी करणे अपेक्षित आहे. तसे न झाल्यास इतर प्राणी आणि मनुष्य यांच्यात भेदच राहणार नाही. यातून मनुष्य जर सत्प्रवृत्ती असेल किमान त्यांच्यातील कृतज्ञतेची भावना मरण पंथाला गेली नसेल, तर इतरांसाठी काहीतरी करण्याची भावना वाढीस लागते हीच सामाजिक बांधिलकी होय.

या संपूर्ण जीवनात (विश्वात) आपल्या जीवनाइतके दुसरे महत्वाचे काहीही नाही. हे मानवी जीवन त्रासलेले तसेच त्रिमिती आहे. या जीवनाला लांबी (वय), रूंदी (प्रकृती), आणि खोली (इतरांसाठी तुम्ही काय केले) आहे. माणसाचे खरे मोठेपण या तिसऱ्या मितीवर ठरते. प्रख्यात धन्वंतरी डॉ.ह.वि.सरदेसाई यांचे हे विचार निश्चितच चिंतनीय, मननीय, अनुकरण करण्यसारखे आहे. अशा त्रिमिती जीवनाची आपल्या देशाला अतिशय मोठी परंपरा लाभली आहे. सामान्य माणसाला त्या थोर व्यक्तिमत्वाइतके आदर्शवादी होता येणार नाही, परंतू त्यांच्या मार्गावरील गवताचे एखादे पाते व्हावे असे अनेकांना वाटते. त्या अनेकांमधील मी एक असावे असाही विचार प्रत्येकाने करावा असे मला वाटते. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास औदयोगिक घराण्यांची सामाजिक बांधिलकी हा विषय सगळयांसाठीच खूप गांभीर्याने घेण्याचा आहे.

मध्यंतरी सोशल नेटवर्कवर एक प्रश्न विचारण्यात आला होता की, रतन टाटांचे नाव जगातील श्रीमंतांच्या यादीत अडानी, अंबानी,मल्लयांसारखे का झळकत नाही? याचे उत्तरही 'सीएसआर' मध्येच आहे. 'टाटा सन्स' या मुख्य कंपनीची अधिकतर मालकी टाटांनी स्थापन केलेल्या सामाजिक ट्रस्टकडे असून रतन टाटांकडे म्हणजे कोणा एका व्यक्तिकडे नाही. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात 'सीएसआर' हे एखादया निसर्गचक्राप्रमाणे असते. जे काही समाज, पर्यावरणाकडून मिळाले तेच पुन्हा त्यांना अर्पण करणे हे त्याचे उत्तरदायित्व असते. 'सीएसआर' चे दृश्य स्वरूप खालीलप्रमाणे असू शकते :–

१. सर्व सामान्य लोकांसाठी स्वस्त दरातील स्पेशालिटी रूग्णालयांची सोय. उदा. टाटा कॅन्सर मेमोरिअल हॉस्पिटल

२. एखादी महापालिकेची शाखा दत्तक घेणे. उदा. एल ॲण्ड टी कंपनीने घेतलेली पवई येथील पालिकेची शाळा.

❖ **सीएसआर साठी आवश्यक तत्वे :—**

१. 'सीएसआर' धोरण बनविण्यापूर्वी समाजाचे अंतर्मन जाणून घ्या, त्यांचे प्रश्न, त्यांच्या अपेक्षा समजून घ्या.

२. 'सीएसआर' संकल्पनेबद्दल ज्यांना मनापासून जिव्हाळा आहे असे कर्मचारी शोधा. 'सीएसआर' मधून कंपनीचे हित जोपासणाऱ्या व्यवस्थापकांची निवड करा. उदा. मार्केटिंग मॅनेजर, फॅसिलिटी मॅनेजर किंवा पॅकिंग मॅनेजर

३. 'सीएसआर' फक्त कंपनी बाहेरच्या लोकांसाठी नसावी तर कंपनीमधील कर्मचाऱ्यांसाठीही असावी. उदा. रासायनिक खतांऐवजी जैविक खतांचा वापर करून पिकविलेल्या भाज्या व फळे यानांच कॅन्टीनच्या मेनूमध्ये फॅसिलिटी मॅनेजरने प्राधान्य देणे.

४. 'सीएसआर' मध्ये कर्मचाऱ्यांसाठी विशेष पुरस्कार दिले जावेत. उदा. पॅकेजिंग मटेरिअलमध्ये रिसायकल मटेरिअल वापरणाऱ्या व्यक्तीस, ५० वेळा रक्तदान करणाऱ्या व्यक्तीस, कॅन्टीनमधील अन्नाची नासाडी वाचविणाऱ्या व्यक्तीस वगैरे.

५. कंपनी 'सीएसआर' अतंर्गत काय—काय उपक्रम राबवते. त्यांचे फायदे कसे दिसत आहेत. त्यातील अडचणी काय आहेत. याबाबत कर्मचारी व समाजाशी वरचेवर संवाद साधावा. त्यासाठी कंपनीचा वार्षिक अहवाल, फेसबूक कंपनी, वेबसाईट यांचा वापर करावा.

६. 'सीएसआर' मधील गुंतवणमक दीर्घकालीन असते व त्याचे दृश्य परिणाम फायदे दिसल्यास वेळ लागतो याची जाणीव असावी.

७. 'सीएसआर' आपलया प्रमुख व्यवसायाशी निगडीत असावी. उदा. जर शीतपेये बनविणारी कंपनी जर वारेमाप भूजल वापरात असेल तर त्याची क्षती भरून काढण्यासाठी 'सीएसआर' अंतर्गत कंपनीने जलसंधारणाची कामे करावीत. सॅनिटरी पॅड बनविणाऱ्या कंपनीने पौंगडावस्थेतील मुलींसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. **तात्पर्य काय तर 'सीएसआर'म्हणजे कंपनी 'सक्सेसरेट वाढविण्याचे साधन म्हणूनही वापरावे.**

❖ संदर्भग्रंथ

१. जोशी संजय भास्कर, ' आहे कॉर्पोरेट तरी समकालीन', प्रकाशन — पुणे
२. नांदेडकर ज्योती, 'भारतीय उदयोजिका'
३. पिल्लई राधाकृष्णन, 'कॉर्पोटर चाणक्य' प्रकाशन — पुणे
४. डॉ.रूपा शाह आणि डॉ. बी.एच.दामाजी, 'सहकाराचा विकास', फडके पब्लिकेशन
5- https://sahakarbharti.org.
6- https://vikramresearchjournal.wordpress.com